


# ताओ उपनिषद

शंभू गणपुले

# ताओ उपनिषद

शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान



# ताओ उपनिषद


अनुवादक : शंभू गणपुले

योगिनी बंगला, १८६/१८७,

गणेश कॉलनी, पेठ वडगांव, ४१६११२

jayant.karandikar@gmail.com

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३१ मे २०१५

©esahity Pratishthan® 2015



- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# ताओ उपनिषद

**प्रस्तावना** -

९ मार्च या तारखेने माझ्या आयुष्यात अनपेक्षितपणे उत्साहवर्धक क्षण आणले आहेत. ९ मार्च १९३९ हा माझा जन्म दिवस. त्यानंतर जवळ जवळ पन्नास वर्षांनी म्हणजे ९ मार्च १९९० या दिवशी मी दोन चांगली पुस्तके विकत घेतली. त्यापैकी एक होते 'ताओ-ते-चिंग'चं इंग्रजी भाषांतर तर दुसरे होते 'अन् कॉमन विजडम्' (असामान्य शहाणपण). त्यानंतर सहा महिन्यांनी डॉ.काप्रांचे 'ताओ ऑफ फिजिक्स' हे पुस्तक सुद्धा मिळवले. या तीनही पुस्तकांनी मला आतून-बाहेरून झंजाळून टाकले.

खरं तर 'ताओ' आणि 'फिजिक्स' चा माझ्याशी कुठंही आणि कधीच संबंध आला नव्हता. खराब नोटा तपासून त्या जाळून टाकण्याच्या कामावर रिझर्व बँकेत नोकरी करतां करतां, आणि रात्रीच्या कॉलेजमधे अर्थ-शास्त्र आणि कायद्याचा अभ्यास करतां करतां मी बी.ए.एल्.एल्.बी. झालो खरा, पण माझ्यामधे लेखन-वाचनाची आवड निर्माण झाली ती 'पातंजल योगशास्त्राचे' लेखक, माझे आजोबा (आईचे वडील) श्री. कृ. के. कोल्हटकर यांचा लेखनिक म्हणून काम केले तेव्हा. माझ्या आजोबांनीच मला संदर्भ करसे शोधायचे, लिहिलेल्या भागाचं पुन्हा पुन्हा वाचन करून, योग्य तेथे योग्य शब्द कसे बदलायचे, एकाद्या संकल्पनेचा विस्तार कसा व कां करायचा, एकादा विचार संपला की

परिच्छेद बदलायचा, वगैरे गोष्टी शिकवल्या. त्या मुळंच माझ्या मनांत, आपणही कांहीतरी लिहावं अशी उर्मी निर्माण झाली. पहिल्या पहिल्यांना वात्रटिका, दोन तीन कडव्याच्या कविता आणि नंतर एकांकिका, संपूर्ण नाटक, वैचारिक लेख अशी धडपड करत करत 'ताओ'चं मराठीत भाषांतर करण्यापर्यंत मजल मारली.

'ताओ'चा मूळ लेखक लाओत्से हा कन्फुशियसचा समकालीन–म्हणजे ख्रिस्त पूर्व पाचव्या–सहाव्या शतकांत होऊन गेला असे मानले जाते. त्या काळात चीन मधे लिहिण्याचं साधन म्हणजे 'बांबू टॅबलेटस्' होते. अशा टॅबलेटस् चामड्याच्या दोरीने बांधून त्यांची जपवणूक केली जात असे. लाओत्से बद्दल विचार करताना आणि ताओचे

भाषांतर करताना मला जाणवायचे की लाओत्से हा सदैव भटकणारा माणूस असावा. त्याशिवाय ताओ, त्याची महती, निसर्ग, सामान्य माणसांच्या जीवनातला संघर्ष, राज्यकर्त्यांच्या लढाया, आणि डावपेंच, सरकार-दरबारी वावरणाऱ्या माणसांची प्रवृत्ती, माणसा- माणसात आढळणारे सद्गुण-दुर्गुण, स्त्री-पुरूष यांचे व्यवहार वगैरे विषय त्याच्या लेखनात आले नसते.

ताओ-ते-चिंग वाचतांना असं जाणवतं की, लाओ-त्से देशभर फिरत असावा. एका भागात गेला. तिथली दृश्यं बघितली, जन जीवनाचा अभ्यास केला, त्यावर स्वतःचं

मत नोंदवलं, पुढं गेला, तिथली दृश्यं ! म्हणूनच लाओ त्सेनं प्रत्येक अध्यायात दोन-तीन विषयांवर (दृश्यांवर) स्वतःचे मत नोंदवले आहे.

ते सगळे अध्याय वाचनीय, विचाराला चालना देणारे आहेतच पण लाओत्सेला फक्त ताओबद्दल काय जाणवलं होतं ते या पुस्तकाच्या एका परिशिष्टात एकत्र केले आहे. त्या वरून वाचकांना ताओबद्दल जिज्ञासा निर्माण होईल आणि लाओत्सेच्या अवलोकन-शक्तीचा प्रत्यय येईल.

भारतीय संस्कृतीतली ईश्वर किंवा देव ही संकल्पना आणि लाओत्सेनं प्रतिपादित केलेली 'ताओ'ची संकल्पना खूपच मिळती-जुळती आहे. ईशावास्य उपनिषदांत म्हटलं

आहे की, 'ईशावास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्याम् जगत्.' 'अर्थात, या जगांत जे काही आहे ते सर्व त्या ईश्वराचे आहे.' त्याच प्रमाणं लाओत्सेने सुद्धा चौथ्या अध्यायात म्हटले आहे ''त्याच्या खोलीत (उर्शीहि) मधे तो (ताओ) सदैव राहतो. मला माहित नाही तो कुणाची निर्मिती आहे. पण असे भासते तो निसर्गाचा पूर्वज असावा.'' या दोहोतील वर-वर दिसणारे साम्य लक्षात घेऊन मी या पुस्तकाला 'ताओ उपनिषद्' हे शीर्षक वापरलं आहे.

जे वाचक जिज्ञासेपाटी या पुस्तकाकडे वळतील त्यांचे आभार मानून आणि त्यांना सुख–समृद्धी लाभो अशी ताओला, अर्थात ईश्वराला, प्रार्थना करून हे चार शब्द संपवतो. धन्यवाद !

– शंभू गणपुले.

‘योगिनी’ बंगला, १८६/१८७,
गणेश कॉलनी, पेठ वडगांव, ४१६ ११२

# ताओ ते चिंग

## अध्याय - १

- ताओ जर शब्दात सांगता आला तर तो शाश्वत ताओ नाही.
- एकाद्या नावाची व्याख्या करता आली, तर ते अपरिवर्तनीय नाव नाही.
- अन्-अस्तित्व, ही, पृथ्वी आणि स्वर्गाच्या आधीची घटना आहे.
- अस्तित्व ही सर्व वस्तूंची माता आहे.

- म्हणूनच आपल्याला जाणवते की, अनंत पसरलेल्या अनास्तित्त्वातूनच विश्वाची गूढ निर्मिती झाली आहे.
- अनंत काळच्या अस्तित्वातून आपल्याला वस्तू-वस्तूमधला फरक जाणवतो.
- या दोन्ही कल्पनांचा उगम एकच आहे. पण फरक जाणवतो प्रकटीकरणानंतर.
- ही एकरूपता म्हणजेच सर्वात्मकता. या अमर्याद एकरूपततेतून विश्वाच्या वेगवेगळ्या भागाची सुरूवात झाली असावी.

# अध्याय - २

- जेव्हा सर्व जगाला सौंदर्याचा, सुंदरता म्हणून बोध होतो, तेव्हा कुरूपता अस्तित्वात असते.
- जेव्हा सर्वजण चांगुलपणाला, चांगुलपणा म्हणून ओळखतात, तेव्हा दुष्टपणा अस्तित्वात असतो.
- अशा तऱ्हेनं अस्तित्व, अन्‌अस्तित्वाचं सूचक आहे.
- सोप्यातून अवघड उगम पावते; लांबीच्या तुलनेत आखुडाचा बोध होतो; अनुनादानं स्वरांची जुळवणी होते; नंतर आधीच्या मागोमाग येते.

- म्हणून साधूजन क्रीयाहीन कर्मे करतात आणि निःशब्द उपदेश करतात.

## अध्याय - ३

- गुणी जनांची प्रशंसा केली नाही तर सामान्य लोक त्यांचे अनुकरण करणार नाहीत;
- मौल्यवान वस्तूंना महत्व दिले नाही तर त्यांची चोरी होणार नाही;
- अपेक्षित कार्य काय आहे ते सांगितले नाही, तर सामान्य माणसांचा गोंधळ होणार नाही- म्हणून संत त्यांच्यावर अधिपत्य गाजवतो, त्यांची पोटं

*भरून, त्यांची महत्वाकांक्षा क्षीण करून आणि त्यांच्या अस्थि बळकट करून.*

- *तो (संत) लोकांना दुष्टपणा काय असतो त्याचे ज्ञान देत नाही आणि (त्यांच्यात) चांगुलपणाची इच्छाही निर्माण करत नाही. म्हणूनच कावेबाजपणाला संधी मिळत नाही.*
- *संत क्रियाहीन नियमन करतो, परिणामतः नियमन करण्यासाठी काहीच उरत नाही.*

# अध्याय - ४

- ताओची पोकळी उपयोगात आणायची (असे) ठरवले, तरी (ती पोकळी) भरता येणे शक्य नाही.
- त्याच्या (त्या) अगाधतेतूनच सर्व वस्तूचा आरंभ झाला असावा असे वाटते.
- त्याच्या खोलीतच (ऊर्शीहि) तो सदैव राहतो.
- मला माहित नाही तो कुणाची निर्मिती आहे. पण असे भासते, तो निसर्गाचा पूर्वज असावा.

# अध्याय - ५

- स्वर्ग आणि पृथ्वी (त्यांनी केलेल्या) उपकारावर मालकी हक्क सांगत नाहीत.
- त्यांच्या दृष्टीने सर्व वस्तूजात, पेंढा भरलेले बळीचे बकरे असतात.
- साधू सुद्धा (त्यांनी केलेल्या) उपकारावर हक्क सांगत नाहीत.(त्याच्या दृष्टीने) माणसे पेंढा भरलेली असतात.
- स्वर्ग आणि पृथ्वी यांच्या मधली जागा, लोहाराच्या भात्या सारखी असते. ती पोकळ (असल्यासारखी) भासते, पण त्यात कांहीच नसते असे नाही. तो (भाता) हलवला की बरेच काही बाहेर पडते.
- जो जास्त बडबडतो तो लवकर थकतो. त्याच्या आंत असते, ते आंतच राहू द्यावे.

# अध्याय-६

- प्रकृती आणि चैतन्य कधीच मरत नाहीत. दोघं मिळून गूढ मातृत्वाचं (प्रतीक) बनतात.
- त्यांच्या उगम स्थानातूनच स्वर्ग आणि पृथ्वी प्रकट होतात.
- ते उगम स्थान अनंत काळ टिकणारे आहे.
- (कितीही) वापर केला तरी कधीही संपत नाही.

# अध्याय - ७

- स्वर्ग (अनंत काळ) टिकणारा आहे, आणि पृथ्वी सहनशील आहे.
- (ही दोन्ही तत्वं) अनंत काळ टिकणारी आणि सहनशील असतात, त्याचे कारण की ते स्वतःसाठी जगत नाहीत. म्हणून ते जास्त काळ जगतात.
- त्याचप्रमाणे, संत स्वतःला मागे ठेवतो आणि तो समोर दिसतो.
- तो स्वार्थी नसतो या वरूनच त्याचा स्वार्थीपणा सिद्ध होतो का ?

# अध्याय - ८

- उच्चकोटीचा चांगुलपणा पाण्यासारखा असतो. पाणी सर्वांसाठी फायदेशीर असते, पण स्वतः तृप्त होत नाही. ते अशा जागी स्थिरावते (ज्याचा) अन्य लोक तिरस्कार करतात. म्हणूनच ते (पाणी) ताओच्या जवळ असते.
- वस्ती करतांना विचार करा की ती जागा राहण्यासाठी चांगली आहे.
- भावनेच्या भरात, हृदय विशाल करा.
- मैत्रीमधे -माणसांशी (सतत) चांगले संबंध ठेवा.
- बोलतांना-शब्दांवर भरवसा ठेवा.

- *राज्य करतांना-चांगल्या व्यवस्थेचं पालन करा.*
- *मार्गक्रमण करतांना- (समोर आलेल्या) संधीचा उपयोग करा.*
- *गुप्त हेतू नसतो तेव्हा दोष लागत नाही.*

## अध्याय - ९

- पूर्ण भरलेली वस्तू (भांडे) धरून ठेवणे किंवा सांभाळणे . .(त्यापेक्षा) तिला (वस्तूला) तसेच राहू द्यावे.
- पाते (शस्त्र) सारखे हाताळले किंवा धार लावत बसले तर ते जास्त काळ टिकणार नाही.
- जेव्हा बैठकीची खोली सोने आणि रत्नांनी भरलेली असते, कुणीच तिचे रक्षण करू शकणार नाही.
- संपत्ती आणि प्रतिष्ठेचा गर्व आपल्या बरोबर सर्वनाश घेऊन येतो.

– *क्षमता प्राप्त केली आणि नावलौकिक मिळवला की तेव्हाच निवृत्त होणे हाच स्वर्गीय ताओ होय !*

# अध्याय - १०

- तुम्ही चित्त सदैव एकाग्र करून, ते भटकण्यापासून दूर ठेवू शकाल कां?
- तुम्ही श्वासोच्छवासाचं नियमन करून अर्भकाप्रमाणं मृदू आणि मुलायम बनू शकाल कां ?
- तुम्ही आकस्मिक अडचणी टाळून, मुक्त होऊन, दोषातून सुटका करून घेऊ शकाल कां?
- तुम्ही जनतेवर प्रेम करून निष्कर्म राज्य शासन करू शकाल कां?
- तुम्ही स्त्रियांप्रमाणे निसर्गाची द्वारे, बंद किंवा खुली करू शकाल कां ?
- तुम्ही ज्ञानाशिवाय सर्वव्यापी आणि प्रकाशमान होऊ शकाल कां ?

# अध्याय - ११

- तीस ताण (स्पोक्स) चाकाच्या मध्यावर (मधल्या भागात) एकत्र येतात. म्हणजेच ज्या भागात काहीच अस्तित्वात नसतं त्या भागाचा आपण गाडीचे चाक म्हणून उपयोग करतो.
- मातीला आकार देऊन भांडी तयार होतात. (म्हणजे) तो भाग जिथे काहीच अस्तित्वात नसते, तो भाग आपण भांड्यासारखा वापरतो.
- घराच्या भिंती कापून दारे आणि खिडक्या तयार होतात. म्हणजे तेथे मोकळी जागा असते तिचा उपयोग केला जातो.

- *अर्थात, एक प्रकारे आपण अस्तित्वाचा फायदा घेतो तर दुसऱ्या अर्थानं 'अन्-अस्तित्वाचा' उपयोग करून घेतो.*

# अध्याय - १२

- पंचरंग माणसाला दिपवून टाकतील. पंचध्वनी माणसाचे कान बधीर करतील. पंच पक्वान्न माणसाची रूचि बिघडवून टाकतील.
- पाठलाग आणि शिकार माणसाला जंगलीपणाकडे ढकलतील.
- अप्राप्य गोष्टी मिळवण्याची धडपड, माणसाची वर्तणूक बिघडवून टाकतील.
- म्हणून साधू पोटाची (भुकेची) तरतूद करतात, डोळ्याची (नजरेची) नाही.
- तो (साधू) नंतरच्या गोष्टी टाकून देतो आणि आधीच्या गोष्टींची निवड करतो.

# अध्याय - १३

- उपकार आणि मानहानी भितीसारख्या असतात; भाग्य आणि दुर्भाग्य आपल्या शरीरासारखे असते.
- भाग्य आणि दुर्भाग्य भितीसारखे असतात याचा अर्थ काय ? उपकार वरच्या पातळीवर असतो, आणि मानहानी खालच्या पातळीवर असते. तुम्ही या दोन्हींचा स्वीकार केलात तर तुम्ही भयग्रस्त असता. अर्थात, उपकार आणि मानहानी भिती सारख्या असतात.

– *भाग्य आणि दुर्भाग्य आपल्या शरीरासारखे असतात, याचा अर्थ काय ?*

*भाग्य आणि दुर्भाग्य आपल्या वाट्याला येते, कारण आपल्याला शरीर असते. जर आपल्याला शरीरच नसते तर भाग्य आणि दुर्भाग्याने (आपल्यावर) झडप घातलीच नसती !*

– *अर्थात, जो कोणी जगाकडे आपल्या शरीराच्या भाग्यासारखे पाहतो तो जगावर हुकूमत चालवू शकतो. आणि जो कोणी आपल्या शरीराप्रमाणे जगावर प्रेम करतो, जग त्याच्या स्वाधीन होते.*

# अध्याय - १४

- जे आपण पाहतो, पण नजरेत भरत नाही, त्याला साधेपणा म्हणतात.
- जे आपण ऐकतो, पण कानांत भरत नाही त्याला विरळा (स्वर) म्हणतात.
- आपण ज्याच्यासाठी चाचपडतो, पण हाताला लागत नाही, त्याला सुक्ष्म (वस्तू) म्हणतात.
- या तीनही (गोष्टी) जवळून तपासता येत नाहीत. म्हणून त्या एकमेकात मिसळून 'एक' होतात.
- उघड झाले-दिपवून टाकत नाही

- लपवले- अंधार होत नाही.
- अनंत (असते), व्याख्या करता येत नाही.
- ते अनास्तित्वाकडे परत जाते.
- यालाच निराकाराचा आकार म्हणतात आणि अनास्तित्वाची मूर्ती म्हणतात. यालाच 'गूढ' म्हणतात.
- त्याला भेटा-त्याचा चेहरा दिसणार नाही. त्याच्या मागे जा-त्याची पाठ दिसणार नाही.
- भूतकाळातील ताओला चिकटून राहिलात तर तुम्ही आत्ताच्या अस्तित्वावर प्रभुत्व मिळवाल आणि भूतकाळाचा उगम जाणू शकाल.

- यालाच 'ताओ'चा सूचक (उर्श्रीश) असे म्हणतात.

## अध्याय - १५

- प्राचीन काळी 'ताओ-पुरूष' गाढ ज्ञान असलेला, तरल, सूक्ष्म दृष्टीचा होता की त्याला क्वचित समजून घेतले जात असे. म्हणून मी त्याचे चित्र रंगवत आहे.
- तो, सावध असतो, थंडीत पाण्याचा प्रवाह ओलांडणाऱ्या सारखा.
- तो साशंक असतो-आपल्या शेजाऱ्यांना घाबरणाऱ्या सारखा.
- तो विनयशील असतो-कुणाकडे पाहुणचारासाठी गेल्यासारखा.

- *तो शरणागत असतो- वितळण्यासाठी तयार असलेल्या बर्फाच्या (लादी) सारखा.*
- *तो साधा असतो-रांधा न मारलेल्या लाकडा सारखा.*
- *तो रिक्त असतो- (निष्पर्ण) दऱ्या-खोऱ्या सारखा.*
- *तो अंधुक असतो-गढूळ पाण्यासारखा.*
- *अंधाराला स्वच्छ कोण करू शकतो, जोपर्यंत हळू हळू उजेड येत नाही.*
- *ढवळलेल्या /गढूळलेल्याला शांत कोण करू शकते जोपर्यंत ते हळूहळू स्वच्छ होत नाही.*

- स्थिर झालेल्याला कोण गतिशील करू शकतं, जोपर्यंत ते हळूहळू मार्गक्रमण करत नाही (प्रगतीशील होत नाही.)
- जो या तत्वांना अनुसरतो, तो पूर्णत्वाची आस धरत नाही. तो पूर्णत्वाला पोहोचलेला नसतो. म्हणून तो नष्ट होता होता पुन्हा उभारी धरतो.

# अध्याय - १६

- अबाधित पोकळी, शून्यता प्राप्त करण्याचे ध्येय प्राप्त करा.
- पूर्ण शांततेच्या स्थितीत रहा.
- आपण पाहतो (की) सर्व वस्तू अस्तित्वात येतात आणि नंतर परत जातात. (नष्ट होतात.)
- ज्या वस्तूची भरभराट झाली आहे त्या वस्तूकडे पहा. कालांतराने पूर्वस्थितीला पोहोचलेल्या दिसतील.

- पूर्वस्थितीला पोहोचणे म्हणजे शांतता प्राप्त करणे. त्याचाच अर्थ दैवाशी तडजोड करणे. दैवाशी तडजोड करणे म्हणजे अनंताकडे (सनातनत्वाकडे) जाणे.
- ज्याला सनातनत्व कळले त्याच्या अज्ञानाचा नाश होतो.
- ज्याला सनातनत्व कळले नाही तो आंधळ्यासारखा दुःखाच्या खाईत पडतो.
- सनातनत्व कळलेला सर्वस्पर्शी होतो.
- सर्वस्पर्शी झाला त्याला थोरवी प्राप्त होते.
- थोरवी प्राप्त झाल्यामुळे तो सर्वव्यापी होतो.

- सर्वव्यापी झाल्यामुळे तो श्रेष्ठत्व प्राप्त करतो.
- श्रेष्ठत्व प्राप्त झाल्यामुळे तो ताओच्या जवळ जाऊ शकतो.
- ज्याला ताओची समीपता मिळाली तो चिरंजिवी होतो. त्याचे शरीर नष्ट झाले तरी तो कधीही नाश पावत नाही.

# अध्याय - १७

- महान राज्यकर्ते - जनता त्यांच्या अस्तित्वाची दखलही घेत नाही.
- त्यांच्यापेक्षा कमी दर्जाचे (लोक) त्याच्याशी जवळीक करतात आणि स्तुती करतात. त्यांच्यापेक्षाही कमी दर्जाचे (लोक) त्यांना घाबरतात. अगदी खालच्या दर्जाचे (लोक) त्यांची निर्भत्सना करतात.
- कारण जिथे विश्वासाचा अभाव असतो, तिथे विश्वसाने प्रतिसाद देता येत नाही.
- आता, शब्दांना किती महत्व द्यायचे !

## अध्याय - १८

- जेव्हा महान ताओचा विसर पडतो, (तेंव्हा) उपकार-बुद्धी आणि सचोटी उदयास येते.
- जेव्हा चातुर्य आणि धूर्तपणा वाढतो, तेंव्हा महान दांभिक (उदयास) येतात.
- जेव्हा कौटुंबिक संबंध पूर्वीसारखे सलोख्याचे नसतात, तेव्हा आपल्याला तटस्थ मुले आणि भाविक माता-पिता (पहायला) मिळतात.
- जेव्हा देशांत गोंधळ आणि अराजकता असते तेव्हा राष्ट्रप्रेमींची ओळख पटते.

# अध्याय - १९

- विद्वत्ता दूर करा, आपत्तीची जाणीव होणार नाही. संतपणा दूर करा आणि शहाणपण उचकटून टाका-जनतेचा शंभरपट फायदा होईल. उपकार बुद्धी आणि सात्विकता दूर करा-लोक मुलांचे कर्तव्य आणि आई वडिलांचे प्रेम याकडे वळतील.
- शक्कलबाजी, आणि फायद्यासाठी (धडपड) दूर करा-चोर आणि दरोडेखोर दिसणार पण नाहीत.
- ही चार तत्व, संस्कृतीचा भाग समजली, तरी पुरेशी नाहीत.

- म्हणून, लोक सहजपणे अंमलात आणू शकतील असे नियम असावेत.
- साधे दिसा, भपका टाळा, अप्पलपोटेपणाला आवर घाला आणि वासनांना काबी लावा.

## अध्याय - २०

- ‘हो’आणि ‘नाही’ यात किती प रक आहे ? ‘चांगुलपणा’ आणि ‘दुष्टता’ यात किती प रक आहे.
- अन्य लोक ज्याला घाबरतात त्याला आपणही घाबरलं पाहिजे. अशांची संख्या अमर्याद आहे.
- सामान्यपणे माणसे आनंदी असतात जण काही ते मेजवानीचा आनंद लुटत आहेत. किंवा शरद ऋतूत उंच इमारतीत चढून (परिसराचा) आनंद भोगत आहेत.

- मी एकटाच शांत आहे, आणि काही प्रतिक्रिया (भावना) प्रकट करत नाही, लहान अर्भकासारखा जो किंचित हंसूही शकत नाही.
- मी निराश्रित आहे, कारण जाण्यासारखे घरही माझ्याकडे नाही.
- इतरांकडे गरजांपेक्षा जास्त आहे आणि मी अभावात रखडत आहे. शक्यता आहे माझे मन मूर्खाचे आहे.
- असभ्य चमकतात आणि मी एकटाच निस्तेज भासत आहे. असभ्य लोक तारतम्यभाव सांभाळतात. मी एकटाच मात्र निर्भिड भासतो.
- दुर्बोध वाटावा इतका मी उपक्षणीय आहे.

- कुणाशी बांधला गेला नसल्याने मी वाहवत जाणारा (प्रवाहपतित) आहे.
- जनसामान्यांकडे करण्यासारखे काहीतरी असते आणि मी एकटाच हेकट आणि चमत्कारिक वाटतो.
- इतरांपेक्षा मी वेगळाच आहे. (कारण) मी (जगन्) ‘मातेकडून’ उपजिविकेची अपेक्षा करतो.

# अध्याय - २१

- उच्च कोटीचा सद्गुण प्रकट करणे म्हणजे ताओच्या मागे जाणे.
- ताओ एक अशी वस्तू आहे जी अदृश्य आणि अस्पर्श आहे.
- अदृश्य आणि अस्पर्श असला तरी (ताओला) आकार आहेत.
- अदृश्य आणि अस्पर्श असला तरी (ताओ) मधे सत्व आहे.
- सूक्ष्म, अव्यक्त असला तरी त्यामधे तत्व आहे.
- पूर्वीपासून आजपर्यंत (ताओने) आपल्या नावाला बट्टा लागू दिला नाही.

- *त्याच्यातूनच सर्व वस्तूजात उगम पावतात.*
- *सर्व वस्तू (ताओ) त्याच्यातून उगम पावतात हे मला कसे कळल ?*
- *ताओ मुळेच !*

# अध्याय - २२

- विनम्र रहा (तरच तुमचे अस्तित्व) तुम्ही अखंड रहाल
- वाव ा, (तरच) तुम्ही ताठ (उभे) राहू शकाल.
- रिक्त रहा, (तरच) तुम्ही पूर्णत्व प्राप्त कराल.
- जीर्ण व्हा, (तरच) तुम्ही नवी (नव्हाळी) प्राप्त कराल.
- ज्याच्या जवळ थोडे आहे, (त्यालाच) अधिक मिळेल.
- ज्याच्याजवळ खूप आहे, तो गोंधळून जाईल.
- म्हणून संत एकच ठेवून घेतो आणि तो जगाचा आदर्श (मापदंड) होतो.
- तो स्वतःचं प्रदर्शन करत नाही, म्हणून तो चमकतो.

- *तो स्वतःला मान्यता देत नाही, म्हणून त्याची नोंद घेतली जाते.*
- *तो आत्मस्तुती करत नाही म्हणून त्याच्यामधे क्षमता असते.*
- *तो स्वतःला गौरवान्वीत समजत नाही म्हणून त्याला श्रेष्ठत्व प्राप्त होते.*
- *आणि तो स्पर्धा करत नाही म्हणून जगातलं कोणीही त्याच्याशी स्पर्धा करू शकणार नाही.*
- *एक प्राचीन म्हण आहे, 'विनम्र रहा, तुम्हाला बाधा पोहोचणार नाही.'*
- *हे केवळ शब्दजंजाळ आहे का ? नाही. तो खरंच यशस्वी होऊन घरी परत येईल.*

# अध्याय - २३

- शब्द जपून वापरणे (हे तंत्र) नैसर्गिक आहे.
- सुसाट वारा सकाळभर टिकणार नाही. सडकून काढणारा पाऊस दिवसभर टिकणार नाही. पृथ्वी आणि स्वर्ग अनंत काळ टिकणारे नसतील तर माणूस (तरी) कसा टिकेल? जो ताओच्या अनुसंधानात राहतो, तो ताओच्या सरूप होतो. जो सद्‌गुणांचे पालन करतो, तो सद्‌गुणी म्हणून ओळखला जातो. जो त्याग करू लागला तो त्यागमूर्ती

*झाला. ज्याने ताओचे अनुसंधान केल, ताओ त्याचे स्वागत करेल. त्यागमूर्ती म्हणून ओळखला गेला त्याचा त्यागच स्वीकार करेल.*

# अध्याय - २४

- चवड्यावर माणूस स्थिर उभा राहू शकणार नाही.
- पाय प ाकून माणूस प ार चालू शकणार नाही.
- स्वतःला मान्यता देणारा माणूस - त्याची दखल घेतली जाणार नाही.
- आत्मस्तुती करणाऱ्या माणसांत क्षमता असत नाही.
- आत्म-गौरवात गुंतलेला माणूस कुणालाच मागे टाकू शकणार नाही.
- यांची ताओशी तुलना केलीच तर असे म्हणता येईल ‘खायला कहार, कामाला नकार.’

- इतर बाबतीतही बहुधा (अशी माणसे) नाकारली जातात. म्हणूनच ताओचे भक्त अशा माणसांबरोबर रहात नाहीत.

## अध्याय - २५

- स्वर्ग आणि पृथ्वीच्या आधी अशी एक गोष्ट अस्तित्वात आली आहे जी अचल आणि अगाध असून निसर्गात अधिष्ठित आहे. ती एकटी असते आणि कधीही बदलत नाही. ती सर्व व्यापी असूनही संपत नाही. तिला विश्वमाता असे नाव देता येईल.  मला तिचे नाव माहीत नाही. पण नाव देण्याची माझ्यावर सक्ती झाली तर मी तिला परमश्रेष्ठ 'ताओ' म्हणेन. श्रेष्ठ म्हणजे सर्वात महान.  परम म्हणजे पुढे जाणारा, पुढे जाणारा म्हणजे, दूर जाणारा, दूर जाणारा म्हणजे मागे fप रणारा. म्हणून ताओ महान

*आहे, स्वर्ग महान आहे, पृथ्वी महान आहे, आणि माणूसही महान आहे. या विश्वात चार गोष्टी श्रेष्ठ आहेत आणि माणूस त्यापैकी एक आहे. माणूस पृथ्वीचे कायदे पाळतो, पृथ्वी स्वर्गाचे कायदे पाळते, आणि स्वर्ग ताओचे कायदे पाळतो, आणि ताओ त्याच्या मूळ स्वभावाचे कायदे पाळतो.*

# अध्याय - २६

- जडत्व हा हलकेपणाचा आधार आहे.
- शांतपणा ही घाईला काबूत ठेवणारी शक्ती आहे.
- म्हणूनच साधू दिवसभर प्रवास व रत असला तरी आपले सामान दूर ठेवत नाही. अनेक मनोहारी दृश्यांनी वेढला असताना सुद्धा तो आपली शांती ढळू देत नाही. तसे असेल तर शंभर रथांचा मालक असलेला राजा आपल्या राज्यात शांतपणे कसा वावरू शकेल ?
- हलके होणे म्हणजे मूळ आधारापासून तुटणे.
- गडबड करणे म्हणजे काबूत ठेवणाऱ्या शक्तीपासून तुटणे !

## अध्याय - २७

- हुशार प्रवासी (आपल्या प्रवासाच्या) खाणा-खुणा मागे सोडत नाही.
- चांगला वक्ता (आपल्या) भाषणात चुका करत नाही.
- चांगली आकडे मोड करणाऱ्याला संगणकाची गरज भासत नाही.
- चांगला बंदोबस्त करणाऱ्याला कडीकोयंड्याची गरज भासत नाही. तरीपण त्याच्या अपरोक्ष (दार) उघडणं शक्य होत नाही.
- चांगले बांधून ठेवणाऱ्याला दोर आणि गाठींची गरज पडत नाही. तरीपण त्याच्या अपरोक्ष बंध सोडणे शक्य होत नाही.

- माणसे जरी वाईट असली तरी त्यांचा तिरस्कार कां करावा ? म्हणूनच साधू नेहमी मानजातीच्या बचावाचा विचार करतो. (परिणामी) कोणत्याही माणसाला तो नाकारत नाही.
- तो (साधू) सर्वांचा रक्षक असतो. कुणालाही नाकारत नाही. याला दुहेरी बोध असे म्हणतात.
- म्हणूनच चांगली माणसे दुष्ट माणसांचे समुपदेशक बनतात आणि वाईट माणसे चांगल्या माणसांना साधने पुरवतात.

- *जे आपल्या शिक्षकांना मान देत नाहीत आणि जे आपल्या साधनावर (विद्यार्थ्यावर) प्रेम करत नाहीत (ते) कितीही घाईत असले तरी गोंधळलेले असतात.*
- *यालाच गूढता म्हणतात.*

## अध्याय - २८

- ज्याला पौरूषत्व कळले आहे आणि तरी जो स्त्रीत्वाला जपतो, तो सर्व जगाला आपल्याकडे ओढून घेण्याचे साधन (कालवा) बनेल. जगाला ओढून घेण्याचे साधन बनलेली (व्यक्ती) शाश्वत सद्‌गुणापासून तुटू शकणार नाही आणि नंतर तो पुन्हा बाल्यावस्थेकडे परतू शकेल.
- ज्याला शुभ्रता कळली आहे तरी पण जो कृष्ण वर्ण जपतो तोच जगाचा मापदंड होऊ शकतो. जगाचा मापदंड झाल्यामुळे तो सद्‌गुणापासून ढळत नाही. नंतरच तो पूर्णत्वाकडे जाऊ शकेल.

- ज्याला सन्मान कळला आहे तरी जो नम्रपणा जपतो तो (महाउदरी) दरी होऊन सर्व जगाला आपल्यात सामावून घेतो. सर्व जगाची दरी बनल्यामुळे त्याच्यामधे अनेक सद्गुण पूर्णत्वाला पोहोचतात आणि त्यानंतरच तो अक्षुण्णतेकडे परततो.
- पूर्णत्वाचे भाग केले जातात तेंव्हा (ते भाग) उपयुक्त साधने बनतात. साधू जेव्हा ती साधने उपयोगात आणतात तेंव्हा ते अधिकारी आणि प्रमुख बनतात.
- पण महान कार्यासाठी अशा प्र रकाची गरज नसते.

## अध्याय - २९

- जेंव्हा माणूस (सर्व) जगाची मालकी आपल्याकडे घेऊन त्याला आकार देण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी असे दिसते की, तसे करण्यावाचून त्याला पर्यायच नसतो. कारण विश्व, हे ईश्वरीय पात्र (भांडे) आहे. म्हणून त्याला आकार देता येणार नाही, तसा आग्रह धरता येणार नाही. जो कोणी तसा आग्रह धरेल, तो त्याचा आकार बिघडवून टाकेल. म्हणून संत (जगाला) आकार देत नाहीत, म्हणून आकार बिघडवत पण नाही.

तो तसा आग्रह धरत नाही म्हणून (ते) त्याच्या हातून निसटत पण नाही.

- सर्व बाबतीत असे म्हणता येईल की काहीजण पुढे जातात, आणि बाकीचे मागे पडतात. काहीजण तोंड बंद ठेवतात, तर काहीजण बढाया मारतात. काहीजण सशक्त असतात, तर काहीजण अशक्त, काहीजण गाडीवर चढतात, तर काहीजण खाली पडतात.
- म्हणून साधू लोक अतिरेक, उधळपट्टी, (आणि स्वतःचे) लाड करणे टाळतात.

# अध्याय - ३०

- लोकांवर राज्य करणाऱ्याला (राजाला) जो ताओच्या मदतीने सहाय्य करतो, तो जगावर बलप्रयोग करत नाही. त्याचा उद्देश प क्त मदत करण्याचा असतो म्हणून तो इतरांसमोर शक्ति प्रदर्शन करत नाही. जेव्हा दुःखाचा परिहार होतो तेव्हा तो अहंकार बाळगत नाही. बढाया मारत नाही किंवा गर्वही बाळगत नाही. (उलट) तो असा विचार करतो की ते माझे कर्तव्यच होते.

- *या सगळ्याचा निष्कर्ष असा की दुःखांचा परिहार बलप्रयोग टाळूनच करता येतो.*
- *जेव्हा गोष्टी त्यांच्या क्षमतेच्या शिखरांपर्यंत पोहोचतात तेव्हा त्या म्हाताऱ्या होऊ लागतात.*
- *हे ताओच्या विरूद्ध आहे. जे ताओच्या विरोधात जाते ते लवकरच नष्ट होते.*

# अध्याय - ३१

- हत्यारांच्या बाबतीत बालायचं झालं तर ती दुष्टांची साधने असतात. ताओच्या मार्गावर चालणाऱ्यांना ती उपयोगाची नाहीत. कारण शस्त्रे, बदला घेण्यासाठीच वापरली जातात.
- जिथे सैन्य तळ ठोकते तिथे जंगली झुडपे आणि काटे पसरलेले असतात.
- महायुद्धानंतर अनेक वर्षें दुर्भिक्ष येतेच.
- ताओ पुरूष घरांत वस्ती करतांना शत्रूवर लक्ष ठवण्यात सन्मान मानतात आणि शस्त्रांचा वापर करताना सत्याचा मान राखतात. तो

*अटळ परिस्थितीतच शस्त्रांचा वापर करतो. (शत्रूवर) विजय मिळवला तरी त्याला आनंद वाटत नाही. तसा आनंद मिळाला तर त्याचा अर्थ होईल की, माणसांची कत्तल करण्यात त्याला सुख मिळते.*

- *माणसांच्या माना कापण्यात ज्याला सुख-आनंद मिळतो तो जगात आपली इच्छा राबवू शकणार नाही.*

# अध्याय - ३२

- ताओ नेहमीच अनामिक होता.
- जेव्हा पहिल्यांदा त्याला कामाशी जोडला गेला, तेंव्हाच त्याला नाव दिले गेल.
- (आपण) कितीही नामनिर्देश व रत राहिलो, तरी आपल्याला कोठे थांबायच तेही कळले पाहिले.
- कोठे थांबायचे हे ज्याला कळले तो अविनाशी होतो.

# अध्याय - ३३

- ज्याला दुसऱ्यांची ओळख पटते तो शहाणा असतो.
- ज्याला स्वतःचीच ओळख पटते तो ज्ञानी असतो.
- जो दुसऱ्याला जिंकतो तो शक्तिमान असतो.
- जो स्वतःला जिंकतो तो महाशक्तिमान असतो.
- ज्याला समाधान म्हणजे काय ते कळते तो श्रीमंत असतो.
- जो आपल्या मार्गावर चिकाटीने चालत राहतो त्याच्या ठिकाणी (प्रबळ) इच्छाशक्ती असते.

- *जो आपल्या उचित स्थानापासून भरकटत नाही, तो (त्या स्थानावर) जास्त काळ टिकून राहतो.*
- *जो मृत्यूनंतर सुद्धा नाश पावत नाही तो दीर्घायुषी असतो.*

# अध्याय - ३४

- महान ताओ सर्वव्यापी आहे. तो उजव्या आणि डाव्या दोन्ही बाजूला पसरलेला आहे. त्याच्या पासून सर्व वस्तू अस्तित्वात येतात आणि तो त्यांना झिडकारत नाही.
- गुणवत्ता प्राप्त केली तरी तो त्याच्यावर मालकी हक्क सांगत नाही.
- तो (ताओ) सर्वांवर प्रेम करतो, सगळ्यांचे भरण-पोषण करतो, पण त्याच्या बोकांडी बसत नाही.

- तो नेहमी अनास्तित्वात (अदृश्य) असतो म्हणून त्याला ‘लघु’(लहान) असे नांव देता येईल.
- सर्व वस्तू त्याच्याकडे परत जातात, तरी तो त्यांच्यावर मालकी हक्क गाजवत नाही, म्हणून त्याचे ‘महान’ असे नामकरण करता येईल.
- तो कधीही स्वतःकडे मोठेपणा घेत नाही. म्हणून तो मोठेपणा संपादन करू शकतो.

# अध्याय - ३५

- जो महद् आकार धारण करतो त्याच्याकडे सर्व जग जाईल. तेथे गेल्यावर (त्याला कळेल) की येथे कसलाच धोका नाही. (उलट) आहे प वत मनःशांता, समानता आणि समाईक मालकी. (तर्थाल) संगीत आणि मिष्टान्न, जाणाऱ्या अपरिचिताला थोपवून धरेल.

- ताओ या शब्दाचा उच्चार केला तरी शुद्ध आणि रूचिहीन भाव निर्माण होतो.

- एकादा त्याच्याकडे पाहील, पण त्याला तो दिसणार नाही. एकादा त्याला ऐकेल- पण त्याला ऐकू येणार नाही.

- पण, कुणी त्याला वापरण्याचा प्रयत्न केला तरी संपून जाणार नाही.

# अध्याय - ३६

- एकादी वस्तू संकुचित करायची असेल तर प्रथम तिचा पसारा वाढवला पाहिजे. (एकाद्याला) शक्तीहीन करायचं असेल तर आधी त्याला सशक्त बनवले पाहिजे. खाली आपटण्या आधी, डोक्यावर घतले पाहिजे. काही घ्यायचे असेल तर आधी दिले पाहिजे. यालाच गूढ शहाणपणा असे म्हणतात.
- कोमल आणि अशक्तच (माणूस किंवा वस्तू) टणक आणि कणखराला डबघाईस आणू शकते.
- माशाने ज्या प्रमाणे खोल पाण्यातून बाहेर येऊ नये, त्याप्रमाणे राष्ट्राची प्रमुख आणि तीक्ष्ण हत्यारे कोणाला दाखवू नयेत.

# अध्याय - ३७

- ताओ सदैव निष्क्रीय असतो, पण तो करू शकत नाही असे काहीच नसते. जर राजकुमार आणि राजे यांनी हे मान्य केले तर सर्व गोष्टी आपोआप विकसित होतील. त्यांचा विकास झाला की त्यांच्यात वासना उत्पन्न होतील. त्यांना वासना विरहित करण्यासाठी मी अनामिक साधेपणाच्या नावाने त्यांना प्रतिबंध करीन. वासना मुक्त झाल्यामुळे ते शांत बसतील, आणि जग आपणहून सुधारेल.
- साधेपणा कितीही क्षुल्लक वाटला तरी सर्व जग नम्रपणे त्याचा स्वीकार करणार नाही.

- जर राजे आणि राजकुमार (त्या साधेपणाचा) स्वीकार करतील तर जगातले सर्वजण त्यांना आपणहून आदरांजली वाहतील.
- मधुर दवबिंदू (खाली) पाठवण्यासाठी आकाश आणि पृथ्वी एकत्र येतील.
- जनतेला आदेश देणारे कुणीच न राहिल्यामुळ (जनता) आपणहून एकत्र येईल.
- जेव्हा गुणवत्ता संपादन केली जाईल आणि व्यवहार पूर्ण केले जातील, तेव्हा लोक आपणहून मान्य करतील की आम्ही निसर्गाच्या मार्गावर चालत आहोत.

## अध्याय - ३८

- उच्च कोटीच्या सद्गुणाला जाणीव नसते की तो स्वतः सद्गुण आहे. म्हणून त्याच्यामधे सद्गुण असतो.
- नीच कोटीचा सद्गुण कधीही सद्गुण प्रकट करत नाही म्हणून त्याच्यामधे सद्गुण नसतो.
- उच्च कोटीचा सद्गुण निष्क्रीय भासतो, तरीपण तो करत नाही असे काहीच नसते. कमी प्रतीचा सद्गुण कर्म करतो पण शेवटी कर्म पूर्ण न करताच सोडून देतो.

- उच्च कोटीचा उपकार, हेतू शिवाय कर्म करतो.
- उच्च कोटीचा प्रामाणिकपणा सहेतुक कर्म करतो.
- उच्च कोटीचे कर्मकांडी कर्म करतात, पण प्रथमतः कोणीच प्रतिसाद देत नाही. हळू हळू लोक हात उंचावून (कर्मकांडाला) समर्थन देतात. अर्थात, ताओचं प्रस्थ कमी होत तेंव्हा सद्गुण पुढे येतात, सद्गुणांची (महत्ती) कमी होते तेव्हा कर्मकांड उरतात. उपचारातून स्वामीभक्ती, विश्वास आणि गोंधळाची सुरूवात होते.

- *पूर्व ज्ञान ही ताओची मोहोर आणि अज्ञानाची सुरूवात असते. म्हणून खरी ज्ञानी माणसे भरीव (ज्ञान) सांभाळतात, पोकळ नाही, प ळे सांभाळतात, प ले नाही. म्हणजेच नंतरची अवस्था टाकून पूर्व अवस्था स्वीकारतात.*

## अध्याय - ३९

- प्राचीन काळापासून ज्या वस्तूंनी ऐक्य आत्मसात केले त्या अशा आहेत
  -
- स्वर्ग ऐक्यामुळे स्वच्छ झाला आहे, पृथ्वी ऐक्यामुळे स्थिर झाली आहे, चैतन्य ऐक्यामुळे स्पूर्तीदायक झाले आहे, दरी ऐक्यामुळे पूर्ण (भरली) आहे. सर्व वस्तूजात ऐक्यामुळे अस्तित्वात आल्या आहेत.
- राजे आणि राजकुमार ऐक्यामळे विश्वावर राज्य स्थापन करू शकले.

- स्वर्ग स्वच्छ झाला नसता तर त्याला भगदाड पडले असते, पृथ्वी स्थिर नसती तर ती कोसळली असती; चैतन्य कार्यप्रवण नसते, तर (असेच) विरून गेले असते, दरी (झाडा-प लांनी) भरलेली नसती, तर वाळून गेली असती; जर राजकुमार आणि राजा, राज्यकर्ते नसते तर पद भ्रष्ट झाले असते.
- अमीर/उमरावांना 'नम्र' असे किताब मिळतात.
- सर्व वस्तूजात अस्तित्वात नसतील तर त्या अस्तित्व हीन होतील.
- उच्च पदस्थांनी नीच स्थान त्याचा पाया म्हणून स्वीकारावे.

- म्हणून राजे आणि राजकुमार स्वतःला ‘अडाणी’, ‘अवगुणी’ ‘नालायक’ म्हणवून घेतात.
- त्याचा अर्थ असा होत नाही कां ते (राजे, राजकुमार) विनम्रता हा त्यांचा मूळ (स्वभाव) आहे (असे) समजतात.
- माणसे ज्यांचा जास्त तिरस्कार करतात (अशी माणसे) ‘अडाणी’‘दुर्गुणी’ आणि ‘नालायक’ असतात. तरी राजे आणि राजकुमार त्या शब्दांचा पदवी म्हणून स्वीकार करतात.

- म्हणून (असे म्हटलं जाते) की श्रेष्ठ प्रसिद्धी तीच, की प्रसिद्धी नसावी. अशा तऱ्हेने कमी करण्याने राजघराणे वाढते. किंवा वाढवल्यामुळे कमी होते.
- एकाद्या रत्नाप्रमाणे उठून दिसण्याची इच्छा असू नये, किंवा कंटाळवाण्या असंख्य दगडापैकी एक असू नये.

## अध्याय - ४०

- परत ïप रण ही ताओची गती आहे.
- कमकुवतपणा हे ताओचे साधन आहे.
- विश्वातल्या सगळ्या वस्तूंची निर्मिती अस्तित्वातून होते आणि अस्तित्व अनास्तित्वातून (निर्माण होते).

# अध्याय - ४१

- जेव्हा उच्च कोटीच्या विद्वानाला ताओ बद्दल सांगितले जाते, तेव्हा त्याची साधना करण्यासाठी तो खूप कष्ट घेतो.
- जेव्हा मध्यम कुवतीच्या विद्वानाला ताओ बद्दल सांगितले जाते; तेव्हा कधी तो ताओचे अनुसंधान राखतो, कधी सोडून देतो.
- जेंव्हा निकृष्ट प्रतीच्या विद्वानाला ताओबद्दल सांगितले जाते तेव्हा तो मोठ्याने हसतो. (ताओची टर उडवतो.)
- ताओची अशी टर उडवली गेली नाही, तर तो ताओ कसला ?

- म्हणून असं म्हटलं जातं - ज्ञान देण्याच्या बाबतीत ताओ दुर्बोध वाटतो; पुरोगामित्वाच्या बाबतीत ताओ प्रतिगामी असतो; सरळपणाच्या बाबतीत ताओ खडबडीत असतो.
- उच्च कोटीचा सद्गुण दरीसारखा भासतो; शुद्ध पांढरा रंग, रंग उडाल्यासारखा दिसतो; पराकोटीचा सद्गुण अपुरा वाटतो; भरीव सद्गुण अशक्त वाटतो.
- सरळ स्वभाव (कधीही) बदलू शकतो; मोठ्या चौरसाला कोन नसतात; विशाल आकाराचे भांडे कधीच पूर्णत्वाला पोहचत नाही;

*मोठ्यात मोठा आवाज ऐकू येत नाही; महान् प्रतिमा डोळ्यापुढ आणता येत नाही.*

- *ताओ अदृश्य असून अनामिक आहे; तरी तोच असा एक आहे, जो आपला अंश (मानवाला) देऊन पूर्णत्वाला नेतो.*

## अध्याय - ४२

- ताओमधून एकाचा जन्म होतो. एकातून दोन, दोनातून तीन आणि तिसऱ्यातून सर्व वस्तू जन्माला येतात. सगळ्या वस्तूंच्या पाठीशी सावली (यिन-स्त्री तत्व) असते आणि मुखाशी प्रकाश (पुरूष तत्व यांग) असतो. निराकार हुंकार (त्यांचे) जीवनाचे सूर जुळवतो. (ची)
- दुसरे जे शिकवतात (ते) मीपण शिकवतो.
- धाडसी आणि दांडग्यांना नैसर्गिक मृत्यू येत  नाही. हे नीतितत्वच माझा अध्यापक आहे असे मी मानतो.

## अध्याय - ४३

- अभेद्य गोष्टी (वस्त) मधे प क्त अनास्तित्वच घूसू शकते. यावरूनच मला कळले की कर्म न करणेच उपयोगी आहे.
- शब्दावाचून शिक्षण देता येते, व र्म न करताही उपयोगी पडता येते- जगातल्या प ारच थोड्या लोकांना हे पटले आहे.

## अध्याय - ४४

- प्रसिद्धी किंवा तुमचे व्यक्तिमत्व (यापैकी) काय तुम्हाला जवळचे वाटते ?
- तुमचे व्यक्तिमत्व किंवा संपत्ती (यापैकी) काय तुम्हाला प्रिय आहे ?
- नप ा किंवा तोटा (यापैकी) कोणती गोष्ट अधिक इजा करणार आहे ?
- कोणत्याही गोष्टीचे जास्त आकर्षण, जास्त पैसा खर्च करायला भाग पाडेल.
- जितका जास्त पैसा गोळा कराल, तितके जास्त लुबाडले जाल.

- म्हणून, ज्याला समाधान म्हणजे काय ते कळले त्याची मानहानी होणार नाही.
- कोठ थांबावे हे ज्याला कळले त्याला विपन्न-अवस्था येणार नाही.
- तो जास्त काळ टिकून राहील.

## अध्याय - ४५

- अतिपूर्णत्व, अपूर्ण भासते. तरी त्याची उपयुक्तता अखंड राहते, न विरता.
- पूर्ण भरलेपणा, रिक्त भासतो. तरी त्याचा उपयोग संपवता येत नाही.
- सर्वात मोठा सरळपणा, वाकडातिकडा वाटतो; सर्वात मोठे हस्तकौशल्य निरूपयोगी वाटते; सर्वात प्रभावी वक्तृत्व, तोतरेपणा वाटतो,

- हालचालीने थंडपणावर विजय मिळतो; शांत बसण्याने गर्मीवर विजय मिळतो. पवित्रता आणि शांतता (या माध्यमातूनच) जगावर प्रभुत्व मिळवता येते.

# अध्याय - ४६

- जेव्हा विश्वात ताओचे राज्य असते तेव्हा चपळ घोडेसुद्धा शेतात शेणखताच्या गाड्या ओढण्यासाठी जुंपले जातात. जेव्हा जगात ताओचे राज्य नसते, तेव्हा घोडदळातले घोडे सार्वजनिक जमिनीवर चरत असतात.
- माणसांना हवे ते देण्यासारखा मोठा अपराध नाही.
- समाधान म्हणजे काय ते न ओळखता येण्यासारखी मोठी विपत्ती नाही.
- अधाशीपणाने भोग भोगत सुटण्यासारखे मोठे संकट नाही.

- म्हणून, समाधान म्हणजे काय ते व कळल्यावर मिळणाऱ्या समाधानाचे कायम समाधानच असते.

## अध्याय - ४७

- घराचा उंबरठा न ओलांडताही, एकाद्याला सगळ्या जगाची माहिती मिळू शकते. खिडकीच्या बाहेर न डोकावताही एकाद्याला 'ताओ'चं स्वर्गीय दर्शन घडू शकते.
- प्रवासात जितके पुढे जावे, तितके ज्ञान कमी होत जाते.
- म्हणून प्रवास न करताही साधूचे ज्ञान (जाणीव) वाढत जाते. न पाहतांही तो सगळ्यांचा नामनिर्देश करतो, न करताही त्याला सगळ्या गोष्टी साध्य (प्राप्त) होतात.

## अध्याय - ४८

- जो ज्ञानाचे अनुसरण करतो, तो दिवसेदिवस वाढतच जातो.
- जो 'ताओ'चं अनुसरण करतो त्याचा दिवसे-दिवस ऱ्हास होत जातो (इतका) की शेवटी तो कर्महीन होतो. कर्महीनतेने अनेक गोष्टी करता येतात.

## अध्याय - ४९

- साधूला (स्वतःचा असा) स्वार्थ नसतो. लोकांच्या स्वार्थालाच (हितालाच) तो स्वतःचा स्वार्थ बनवतो.

- चांगल्याशी (लोकांशी) मी चांगुलपणाने वागतो. दुष्टांशी ही चांगुलपणाने वागतो. या प्रकारे चांगुलपणा प्रस्थापित होतो.
- निष्ठावंत (लोकांशी) मी विश्वासानं वागता. विश्वास घातक्यांशीही मी विश्वासाने वागतो. त्यामुळं निष्ठा मिळवता येते.
- साधू जगाशी जुळवून घेत जगतो आणि साधेपणाने जगावर राज्य करतो. तरी सुद्धा सगळे लोक त्याच्याकडे कान आणि डोळे लावून बसतात. कारण साधू लोकांची काळजी घेतो, जशी आई मुलांची काळजी घेते.

## अध्याय - ५०

- जीवन संपते त्यावेळी माणूस मृत्यूच्या (प्रांतात) प्रवेश करतो.
- जीवनाचे प्रमाण तीन दशांश असते, मृत्यूचे प्रमाणही तीनदशांश असते. जन्मल्यापासून मृत्यच्या प्रांताकडे वाटचाल करणाऱ्या माणसांचे प्रमाण सुद्धा दहात तीन असते. . . असे कां होतं ? कारण माणसे जगण्यासाठी अनावश्यक धडपड करतात.
- जे लोक जगण्यासाठी काहीच करत नाहीत ते, जीवनाला (प ाजिल) किंमत देणाऱ्या पेक्षा, चांगल्या अवस्थेत असतात.

- मी असे ऐकलय की ज्याला आपल्या जीवनाची कशी राखण करावी हे चांगले कळलंय्, तो जमिनीवर प्रवास करताना गेंड्याला किंवा वाघाला सामोरा जात नाही, युद्धावर जातांना त्याच्यावर शस्त्राने किंवा हत्याराने हल्ला केला जात नाही. (कारण) गेंड्याला शिंग खुपसण्यासाठी, तसेच वाघाला पंजा मारण्यासाठी तसेच शस्त्राचे पाते खुपसण्यासाठी जागा सापडत नाही. असे का होते ?
- कारण तो मृत्यूच्या पलिकडे गेलेला असतो.

# अध्याय - ५१

- ताओ त्यांचे (सगळ्या वस्तूंचं) उत्पादन करतो. सद्‌गुण त्यांचे पोषण करतो. (सर्व वस्तू) वेगवेगळ्या आकारात प्रकट होतात. प्रत्येक वस्तूला शक्ति प्रदान करून पूर्णत्वाला नेले जाते. म्हणून असंख्य वस्तूपैकी एकही वस्तू ताओचा आदर करत नाही किंवा पूजन करत नाही असे नाही.
- ताओचे पूजन करणे किंवा सद्‌गुणांचा सन्मान या गोष्टी कुणाच्या हुकमावरून केल्या जात नाहीत तर त्या नेहमी स्वयंप्रेरणेनेच होतात.

- *ताओच सगळ्या वस्तू निर्माण करतो, पोषण करतो, वाढवतो, निवारा देतो आणि संरक्षण देतो. अस्तित्वात आलेली कोणतीच वस्तू ताओ नाकारत नाही. मालकी हक्क न सांगता तो त्यांची निर्मिती करतो. त्यांच्यावर अवलंबून न राहता ताओ आपले काम करत राहतो. अधिपत्य न गाजवता त्यांना वर उचलतो.*
- *क्षमता सिद्ध केल्यानंतरही त्यांच्यावर हक्क सांगत नाही, मालकी हक्क सांगत नाही म्हणूनच तो त्यांना दुरावत नाही.*

## अध्याय - ५२

- विश्वाचा आरंभ जेव्हा दृश्य रूपात प्रकट होतो तेव्हा (त्या आरंभाला) विश्व माता असे म्हणता येईल. जेव्हा माणसाला माता सापडते, (कुल, शील, व्यवहार कळतो) त्यावरून मुलासंबंधी अंदाज बांधता येतो. मुलांची ओळख पटली तरी तो मातेशीच संबंधित राहतो. (त्यामुळे) त्याचे शरीर नष्ट झाले तरी तो नष्ट होत नाही. त्याने आपले तोंड बंद ठेवले आणि दरवाजे बंद ठेवले (तरी) तो कधीच थकणार नाही. (पण)

तो सारखा बडबडत राहिला आणि व्यवहार वाढवत राहिला तर त्याला वाचवता येणार नाही.

- वस्तूची सूक्ष्मता ओळखणे याला नजरेची शुद्धता म्हणतात.
- जे कमकुवत आहे त्याच्या बाजूने उभे राहणे याला शक्ती म्हणतात.
- तुमचा प्रकाश वापरा, पण झगमगाट कमी करा. तरच तुम्ही स्वतःला इजा करून घेणार नाही.
- यालाच 'ताओ'च्या शाश्वत मार्गाने जाणे असे म्हणतात.

# अध्याय - ५३

- मला सम्यक ज्ञान असावे आणि महान ताओच्या मार्गावर मी चालत रहावे. . . मला भिती वाटते ती पथ भ्रष्ट होण्याची. (ताओचा) तो महान मार्ग सरळ आणि सोपा आहे. पण माणसे आडमार्गच पसंत करतात.
- एकीकडे राजाचे प्रासाद अतिशय सुस्थितीत राखले जातात तर दुसरीकडे शेतात तण वाढलले असतात आणि धान्याची कोठारे रिकामी असतात.
- कशिदा काढलेली (उंची) वस्त्रे वापरणे; धारदार तलवारी (कमरेला) लटकाऊन ि प रणे; (पक्वान्न) खाणे आणि पिणे यातच तृप्ती मानणे;

*वाजवीपेक्षा जास्त संपत्ती मिळवणे; यालाच चोरीला निमंत्रण देणे असे म्हणतात.*

- *यालाच ताओच्या मार्गापासून भ्रष्ट होणे असे म्हणता येईल का ?*

## अध्याय - ५४

- निष्णात लागवड करणाऱ्याने लावलेली (झाडे) कधीही उपटून टाकता येणार नाहीत. निष्णात मिठी मारणाऱ्याने कवटाळलेल्या वस्तू सोडवून घेता येणार नाहीत.
- अशा तऱ्हेने, त्याची मुले, आणि नातवंडे, अनेक पिढ्यापर्यंत स्वार्थाचा बळी देण्याचा (गुण) चालवत राहतील (राहू शकतील).
- जर त्याने स्वतः, ताओवर लक्ष ठेवले तर त्याचा सद्गुण अस्सल असेल. जर त्याने कुटुंबाचे लक्ष ताओकडे वळवले तर त्याचा सद्गुण भरून

वाहेल. जर त्याने त्याच्या गावाकडे ताओचे लक्ष वळवले तर त्याचा सद्गुण चिरस्थाई होईल. जर त्यान देशाकडे ताओचं लक्ष वळवले तर त्याचा सद्गुण पूर्णत्वाला पोहोचेल. जर त्याने संपूर्ण जगाचे लक्ष ताओकडे वळवले तर त्याचा सद्गुण वैश्विक होईल.

- म्हणून एका माणसाच्या व्यक्तिमत्वावरून अनेक व्यक्तिमत्वांचे निरिक्षण करता येते. एका कुटुंबावरून अनेक कुटुंबाचे निरिक्षण करता येते. एका खेड्यावरून अनेक खेड्यांच निरिक्षण करता येते. एका देशावरून अनेक

*देशांचे निरिक्षण करता येते. एका विश्वावरून अनेक विश्वांच निरिक्षण करता येत.*

- *मला कसे कळले की विश्वावर ताओचं राज्य आहे ?*
- *या निरिक्षणांवरून !*

# अध्याय - ५५

- ज्याला सद्‌गुणांची भरपूर देणगी मिळाली आहे, त्याची तुलता लहान मुलांशी करावी लागेल. कोणताही विषारी किटक त्यांना दंश करत नाही; क्रूर श्वापदे त्याला बळकाऊन घेऊन जात नाहीत; हिंस्त्र पक्षी त्यांच्यावर झडप घालत नाहीत. त्यांची हाडे नाजूक असतात, स्नायू कोमल असतात, (पण) आकलन शक्ति बळकट असते. स्त्री-पुरूषांनी एकत्र येणे (संभोग करणे) म्हणजे काय ते त्याला कळत नाही तरी त्याची लैंगिक वाढ झालेली असते. त्याचाच अर्थ त्याची जीवन-शक्ति

जोमात असत; आवाज न प टता तो दिवसभर रडू शकतो, म्हणजेच जीवनाशी त्याच्या तारा जुळलेल्या असतात;

- ऐक्याची जाणीव होणे म्हणजे सनातनत्वाकडे जाणे.
- शाश्वतकालाचं आकलन होणं म्हणजे अज्ञानाचा नाश होणे,
- आयुष्य वाढणे, म्हणजे संकटांकडे वाटचाल करणे,
- श्वासोच्छ्वास घेण्यासाठी हृदयाला झटायला लावणे म्हणजे प्रेताप्रमाणे कडक होणे.

# अध्याय - ५६

- जे धारदार आहे ते सगळे बोथट करा, ज्याचे भाग करता येतील ते सगळे कापा, जे झगमगीत आहे ते अस्पष्ट करा, धुळीइतके जे नम्र आहे त्या सगळ्यात मिसळून जा. यालाच परिपूर्ण समानता म्हणतात. म्हणूनच तिच्याशी जास्त सलगी करता येत नाही, किंवा दूरही करता येत नाही. तिच्यावर उपकार करता येत नाहीत किंवा अपकार पण करता येत नाहीत. तिला वर उचलता येत नाही किंवा तिचा पाया उखडता येत नाही.
- अर्थात, (समानता) ही जगातली सर्वात मौल्यवान वस्तू आहे.

## अध्याय - ५७

- असं जरी म्हटले जाते की सचोटी आणि नीतिमत्तेच्या जोरावर राजा देशावर राज्य करतो आणि व्यूहरचना करून युद्ध करतो. पण (राजाने) राज्य करावे ते व्यापारात लुडबुड न करता. साम्राज्यावर केव्हाही शासन करता येते, व्यापारात लुडबुड न करता, नाहीतर (राज्य) कधीच करता येणार नाही. हे मला कसे जाणवले? तर या वरून की, राज्यात मर्यादा/ बंधने, कर चुकवेगिरी (असेल) तर माणसं अधिक गरीब होत जातील, माणसे जितकी जास्त धारदार हत्यारे वापरतील, देशात अधिक गोंधळ माजेल, माणसांच्या हातात कला आणि कलाकुसरीची साधने जातील

*तितक्या चित्रविचित्र कलाकृती बघायला मिळतील, अधिकाधिक कायदे आणि नियम तयार होतील, तितक्या जास्त प्रमाणात चोर-दरोडेखोर बघायला मिळतील.*

- *म्हणून साधूजन सांगतो की, मी निष्क्रीयतेचा जितका आश्रय करतो, तितकी लोकात जास्त सुधारणा होते. मी शांतीवर जितके जास्त प्रेम करतो, लोक तितके सद्‌गुणी बनतात, मी जितकी चळवळ कमी करतो, तितके लोक संपन्न होतात. मी वासनातून जितका मुक्त होतो, तितके लोक आपणहून साधेपणा स्वीकारतात.*

# अध्याय - ५८

- जेव्हा सरकार मंदबुद्धी आणि निष्क्रीय असते, तेव्हा जनतेला सुख आणि भरभराट प्राप्त होते.
- जेव्हा सरकार जनतेला दुजा भावाने वागवते, तेव्हा लोक असमाधानी आणि अशांत असतात.
- दुःखावर सुख आधारलेले असते, सुखाच्या खाली दुःख असते.
- सरकारने चुका सुधारण्याचा प्रयत्न केला नाही तर सरकारचे श्रेष्ठत्व कुणाला कळेल ?

- आणि मग सचोटीच व्यूहरचना बनेल आणि चांगुलपणा दुष्टपणा होईल.
- (सामान्य) माणसे प ार पूर्वीपासूनच या बाबतीत अनभिज्ञ आहेत.
- म्हणून साधू रोखठोक बोलला तरी इतरांना (शब्दांनी) जखमी करत नाही. त्याच्या स्वभावाचे कंगोरे इतरांना कापून टाकत नाही. त्याचा सरळ (व्यवहार) इतरांची ओढाताण करत नाही. त्याची हुशारी इतरांना दिपवून टाकत नाही.

# अध्याय - ५९

- लोकांवर राज्य करताना किंवा स्वर्गाची (देवांची) सेवा करताना साधू प क्त नेमस्तपणाचा वापर करतो, केवळ नेमस्तपणामुळेच त्याला स्वर्गाशी (ताओशी) जुळवून घेता येते. ही अनुरूपता म्हणज सद्गुणांची केंद्रीभूत साठवण असे म्हणतात. सद्गुणांच्या केंद्रीभूत साठवणीमुळे त्याला (साधूला) वश करता येणार नाही असे काहीच उरत नाही. वश करू शकणार नाही असे काहीच उरत नाही त्यामुळे त्याचे श्रेष्ठत्व कुणालाच कळत नाही. त्याचे श्रेष्ठत्व कुणालाच न

कळल्यामुळे तो देशाचे स्वामित्व स्वीकारू शकतो. देशाचे स्वामित्व स्वीकारताना तो जे करतो ते मातेच्या प्रेमाशी मिळतं जुळतं असल्याने तो जास्त काळ टिकू शकतो. याचाच अर्थ असा की तो मूळ धरून घट्ट पायावर उभा आहे आणि दीर्घायुष्याच्या आणि अमरतत्वाच्या मार्गाची त्याला जाणीव आहे.

# अध्याय - ६०

- मोठ्या साम्राज्यावर राज्य करावे, ज्याप्रमाणे तुम्ही छोटी मासळी शिजवाल (अर्थात हलक्या हाताने)
- जगावर ताओचे राज्य असू द्या, कोणतीही अदृश्य शक्ति आपली पिशाच्च ताकद दाखवून शकणार नाही.
- पिशाच्च्यामध्ये अधिक ताकद नसते, असे नाही, पण (ताओमुळे) ती ताकद माणसाला इजा करू शकणार नाही.

- पिशाच्च माणसाला इजा करू शकणार नाही, तसेच साधूपण इजा करू शकणार नाही.
- ज्याअर्थी त्यापैकी कुणीच कुणाला इजा करत नाही, त्या अर्थी दोघांचा सद्‌गुणावर अधिकार आहे.

## अध्याय - ६१

- महान राज्य ते (असते) ज्याच्याकडे सर्व नद्या वाहतात, त जगाचे क्षेत्र असते आणि जगाचा स्त्रैण भाग असतो. स्त्री शांत राहून पुरूषावर विजय मिळवते पण ते, (शांती) आपल्याकडे नम्रता घेण्याचे साधन असते. त्याचप्रमाणे मोठे राज्य छाट्या राज्यासमोर नम्रता स्वीकारते, छोटे राज्य, ताब्यात घेण्यासाठी. त्याचप्रमाणं छोटे राज्य माठ्या राज्यासमोर नम्रता स्वीकारते, मोठे राज्य ताब्यात घेण्यासाठी. म्हणजे काहीजण नम्र होतात ते घेण्यासाठी. काही जण नम्र होतात ते गोळा

करण्यासाठी. मोठ्या राज्यांची इच्छा असते की, (आपल्या) राज्यांत पुष्कळ लोक यावेत आणि आपण त्यांचे (पालन, पोषण) रक्षण करावे, आणि छोट्या राज्याची इच्छा असते की आपल्याला अनेक गोष्टी करायला मिळाव्यात. पण दोन्ही राज्ये आपापल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी धडपड करतात तेव्हा मोठ्या (राज्याने) पड खावी.

## अध्याय - ६२

- ताओ सर्व वस्तूंचा उगम आहे, चांगल्या व्यक्तींचं भांडार आणि दुष्ट माणसांचा पालक आहे. म्हणून सम्राटाच्या राज्यारोहणाच्या आणि तीन मिनिस्टरांच्या नेमणुकीच्या वेळी, जडजवाहीर आणि घोडे भेट देण्याऐवजी, जो आसनस्थ होऊन ताओचा विचार मांडतो (त्याला) प्राधान्य दिले जाते.(योग्य समजला जातो.)
- प्राचीन काळी लोक 'ताओ'ला इतवे मूल्यवान कां समजत होते? प्रयत्न करून (ताओला) मिळवता येत होते, आणि पाप करणाऱ्याची मुक्तता

*हात होती म्हणून तर नव्हे? याच कारणांमुळे ताओ ही जगातली सर्वात मूल्यवान वस्तू झाली आहे.*

- *चांगले बोलणाऱ्याला सन्मान मिळतो; चांगले कृत्य करणाऱ्याला श्रेय प्राप्त होते.*

## अध्याय - ६३

- निष्क्रीय कर्म करा, जोखमीच्या कामाची जबाबदारी स्वीकारू नका, चव नाही त्याची चव घ्या.
- साधू निरिच्छ होण्याची इच्छा बाळगतो आणि अप्राप्य गोष्टींना किमत देत नाही. तो शिकण्याचे शिक्षण घेत नाही, पण इतर लोक ज्या परिस्थितीतून गेलेत त्याचे पुर्नअवलोकन करतो. म्हणून तो निसर्गतः घडणाऱ्या घटना घडू देतो. (पण स्वतः) घडवून आणण्याचा प्रयत्न करत नाही.

- क्षुद्र महान आहे, आणि कमी खूप आहे असे समजा.
- अवघड (कामे) सोपी असतानाच करा.
- मोठ्या जबाबदाऱ्या, लहान असतानाच पार पाडा.
- जगातल्या सर्वात कठीण गोष्टींची सुरवात (सोप्या) पासून होते. जगातल्या महान (कार्याची) सुरवात सोप्या (कार्यापासून) होते.
- एका माणसाच्या कवेत सामावणारे झाड उभे राहते ते कोवळ्या कोंबापासूनच. मातीच्या ढिगाऱ्यातूनच नऊ मजली गोपूर (टॉवर) उभे

राहते. माणसाच्या पायाखाली असलेल्या जागेपासूनच हजारो मैलांचा प्रवास सुरू होतो.

- म्हणून साधु मोठ्या गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करत नाही. म्हणून त्याला महान कार्य साध्य करता येते.

- जो सहज आश्वासने देत सुटतो, तो आपला शब्द पाळू शकत नाही. ज्याला अनेक गोष्टी सहज साध्य वाटतात, त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

- म्हणून साधू अनेक कार्य कठीण समजतो, परिणामतः त्याला कोणत्याच अडचणी येत नाहीत.

# अध्याय - ६४

- जे गतीहीन आहे त्याला पकडून ठेवणे सोपे असते.
- ज्या (कार्यावर अपयशाची) पूर्व चिन्हे दिसू लागलेली नाहीत, ते कार्य करण्याची तयारी करणे सोपे असते.
- जे ठिसूळ असते ते सहज मोडता येते.
- जे सूक्ष्म असते ते सहज पसरवता येते.
- एकादी गोष्ट अस्तित्वात येण्याआधीच त्याच्या बाबतीत निर्णय घ्यावा.
- एकाद्या गोष्टीबाबत गोंधळ निर्माण होण्याआधीच त्याचे नियमन करावे.

- सर्वसाधारण माणसे बहुतेक वेळा आपल्या व्यवसायात तेव्हाच अपयशी होतात जेव्हा ते यशाच्या उंबरठ्यावर असतात.
- शेवट (कसा होणार) त्याची काळजी करा, जशी सुरवात (कशी करायची) त्याची खबरदारी घेता.
- (असे घडले) तर तुमच्या पदरी अपयश पडणार नाही.

# अध्याय - ६५

- प्राचीन काळी ताओसाठी झटणाऱ्या लोकांनी ताओचा उपयोग, लोकामधे ज्ञान जागृती करण्यासाठी केला नाही. (उलट) लोकांमध्ये साधेपणा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी केला.
- लोकांवर राज्य करणे कठीण असते कारण त्यांना जास्त ज्ञान असते. म्हणून लोकांचे ज्ञान वाढवून देशावर राज्य करणे म्हणजे (पर्यायाने) देशाचा नाश करणे होय. लोकांचे ज्ञान कमी करून देशावर शासन करणे

*म्हणजे देशावर कृपा करणेच आहे. या दोन मार्गांशी ओळख असणे म्हणजे उदात्त सद्गुणांनी युक्त असणे.*

- *उदात्त सद्गुण हा अपार खोल आणि विस्तृत असतो, तो सर्व गोष्टींच्या (व्यवहाराच्या) विरूद्ध जातो, म्हणूनच तो पूर्ण शांती प्राप्त करतो.*

## अध्याय - ६६

- ताओचे (ज्याप्रमाणे) विश्वाशी नाते असत, (त्याप्रमाणे) तसेच नाते, प्रवाहांचे आणि दऱ्याखोऱ्यांचे, नद्यांशी आणि समुद्राशी असते.
- नद्या आणि समुद्र सर्व दऱ्यांचे राजे असतात कारण पूर्वपक्ष (नद्या आणि समुद्र), उत्तर पक्षापुढे (दऱ्यापुढे) नम्र होतात. या प्रकारे ते दऱ्यांचे राजे बनतात.
- म्हणून साधूने सामान्य जनांच्या वर राहण्यासाठी, त्यांच्याशी बोलताना त्यांच्यापेक्षा खाली रहावे, (मृदू भाषण करावे) आणि लोकांच्या पुढे

*जाण्यासाठी त्याने (साधूने) शरिराने लोकांच्या मागे रहावे. अशा तऱ्हेन तो वर असला तरी लोकांना त्याचे ओझे वाटत नाही. तो पुढे गेला तरी लोकांना अडथळा वाटत नाही.*

- *म्हणून सर्व जग त्याची (तोंडभर) प्रशंसा करण्यात आनंद मानते आणि त्याच्यापासून सुटका करून घेत नाही.*
- *तो कोणाशी स्पर्धा करत नाही म्हणून त्याच्याशीही कोणी स्पर्धा करत नाही.*

## अध्याय - ६७

- सगळे जग मला सांगते 'ताओ महान आहेच, त्यामुळे तो कोणत्याही वर्णनाशी जुळत नाही, म्हणूनच तो महान आहे. त्याचे वर्णन करता येत नाही. कुठल्याही वर्णनाशी तो जुळला असता, तर फार पूर्वीच लहान झाला असता.'
- माझ्याकडं तीन मौल्यवान वस्तू आहेत, ज्या मी पकडून ठेवतो आणि त्यांचे संरक्षण करतो. पहिल्या गोष्टीला प्रेम म्हणतात, दुसरीला संतुलन म्हणतात, तिसरी म्हणजे जगाच्या पुढे न जाण्याची धडपड करणे.

- *प्रेम करत राहिले की व्यक्ती शूर होते. समतोल राखला की व्यक्ती बहूविध होते, जगाच्या पुढे न जाण्याची धडपड करणारी व्यक्ति, प्रमुख अधिकारी बनू शकते.*
- *प्रेमाऐवजी शौर्य प्राप्त होते, एकाद्या व्यक्तीला समतोलाऐवजी मोठेपणा मिळतो, एकादी व्यक्ती मागे राहण्याऐवजी पुढे जाते. या (तीनही गोष्टी) माणसाला मरणाच्या दारात नेऊन ठेवतात.*
- *जो प्रेमाशी युद्ध करतो तो लढाई जिंकतो, जो प्रेमाने संरक्षण करतो तो सुरक्षित राहतो. स्वर्गही (ताओ) प्रेमाने त्यांचा बचाव आणि रक्षण करील.*

## अध्याय - ६८

- उत्तम सैनिक, सनिकासारखा नसतो.
- उत्तम लढवय्या क्रूर नसतो.
- उत्तम विजेता युद्धात भाग घेत नाही.
- माणसांना नोकरीवर ठेवणारी व्यक्ती स्वतःला नोकरांच्या पेक्षा खालच्या पातळीवर ठेवते. यालाच (थोडक्यात) समाधान न मानण्याचा सद्गुण म्हणतात, यालाच माणसांचा योग्य उपयोग करून घेण्याची शक्ती म्हणतात, यालाच ताओशी मिलाप करण्याच्या (वृत्तीचे) श्रेष्ठत्व असे म्हणतात.

## अध्याय - ६९

- प्राचीन काळातल्या एका चालबाजाने म्हटलय 'मी यजमानाची भूमिका स्वीकारण्यापेक्षा पाहुण्याची भूमिका बजावीन. मी एक इंचही पुढे जाण्यापेक्षा एक फूट माघार घेईन.' याचा अर्थ असा की तो कर्मचाऱ्यांचा व्यवस्थापक होण्याचे टाळतो जणू काही कर्मचाऱ्यात अनुक्रम नसतोच. तो आपल्या बाह्या सरसावत नाही जणू काही त्याला हातच नाहीत; तो काहीच ताब्यात घेत नाही जणू काही त्याच्याकडे शस्त्रेच नाहीत. तो संघर्ष करत नाही जणू काही शत्रू अस्तित्वातच नाही. शत्रूला कमी

लेखण्यासारखे मोठे संकट नाही. शत्रूला कमी लेखणे म्हणजे आपली संपत्ती गमावण्याच्या टोकावर पोहोचणे. म्हणून जेव्हा प्रतिद्वंदी सेना रणांगणावर भेटतात तेव्हा दया दाखवणारी सेना जिंकते.

# अध्याय - ७०

- शब्दांना पूर्वज (पृर्वपिढिका) असतात, कामाला अध्यक्ष असतो. माझे शब्द कळण्यास खूप सोपे असतात आणि अमलात आणण्यासही खूप सोपे असतात. पण सर्व जगातल्या लोकांना त कळत नाहीत किंवा कुणी आचरणातही आणत नाही, त्याचे कारण त्यांना माहीत असते की ते मला ओळखत नाहीत. ज्या अर्थी मला ओळखणारे खूपच कमी आहेत, परिणामतः मी कौतुकापलिकडे गेलो आहे.

- साधू जाड्याभरड्या कापडाची वस्त्रे वापरतो. पण त्याच्या हृदयात (चांगल्या विचारांची) हिरे-माणके असतात. तो स्वतःला ओळखतो, पण त्याचे प्रदर्शन करत नाही. तो स्वतःवर प्रेम करतो, पण स्वतःला प्रशंसा योग्य मानत नाही. म्हणजे तो (उत्तर पक्ष) प्रशंसा नाकारतो आणि (पूर्व पक्ष) प्रेम स्वीकारतो.

## अध्याय - ७१

- आपल्याला खूप कळते हे कळले नाही तर खूप चांगले !
- व्यक्तीला कळत नसताना कळतं असे वाटणंही एक विकृतीच आहे.
- या विकृतीचा जेव्हा व्यक्तीला वीट येतो तेव्हा ती व्यक्ती विकृतीपासून मुक्त होते.
- साधू कधीच आजारी नसतो कारण त्याला त्या विकृतीचा वीट येतो म्हणून तो आजारी नसतो.

## अध्याय - ७२

- लोकांच्या मनांत राज्यकर्त्याबद्दल भिती नसेल तर आणखी भितीदायक (काहीतरी) घडणार आहे (असे समजून चाला.)
- (राज्यकर्त्यांनी) काळजी घ्यावी की त्यांना राहायला खूप (अरूंद) जागा देऊ नये, किंवा कृपणपणे गुजराण करायला भाग पाडू नये. ज्यावेळी त्यांची जागा अरूंद असणार नाही तेव्हाच त्यांच्या असंतोषाचा शेवट होईल.

## अध्याय - ७३

- साहस करण्याचे धाडस दाखवील तो नष्ट होईल. पण जो साहस न करण्याचे धाडस दाखवील तो जिवंत राहील. या दोन्ही (कल्पना) मधला प रक कळणे म्हणजे एकापासून होणारा प ायदा आणि दुसऱ्यापासून होणारा तोटा यातील प रक कळणे.
- कुणी सांगावे की त्यापैकी एकाद्या (कल्पनेचा) स्वर्गाने (ताओने) तिरस्कार केला पाहिजे?

- स्वर्गातला ताओ कधी झगडा करत नाही तरी तो विजय मिळवितो. तो बोलत नाही तरी प्रतिसाद देतो. तो हाका मारत नाही तरी सर्व गोष्टी आपणहून त्याच्या जवळ जातात. तो बोलत नाही तरी तो योजना आखतो.
- स्वर्गाचे जाळे विस्तीर्ण आहे आणि जाळ्याच्या धाग्यामधली प ट रूंद आहे, तरी त्यातून कुणाचीही सुटका होत नाही.

## अध्याय - ७४

- जेव्हा लोक मृत्यूला घाबरत नाहीत तेंव्हा त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा देऊन घाबरवण्याचा काय उपयोग आहे? जर लोक सदैव मृत्यूला घाबरले असते आणि विश्वासघात करणाऱ्यांना आपण अटक करून मारून टाकले असते तर तसा विश्वासघात करण्याचे धाडस कुणी केले असत? सर्वश्रेष्ठ मारेकरीच देहदंड देतो. सर्वश्रेष्ठ मारेकऱ्याला सोडून (एकाद्याचा) जीव घेणे म्हणजे श्रेष्ठ सुताराऐवजी आपणच पटाशी चालवण्यासारखे आहे. श्रेष्ठ सुतार सोडून एकाद्याने स्वतः पटाशी चालविली तर स्वतःचा हात कापून घेण्याचा दोष टाळता येणार नाही.

## अध्याय - ७५

- लोकांची उपासमार होते, कारण त्यांचे अधिकारी त्यांच्याकडून जबर कर वसुल करतात म्हणून त्यांची उपासमार होते.
- लोकावर अंमल चालवणे प ार कठीण असते. कारण त्यांचे अधिकारी त्यांच्या (दैनंदिन) व्यवहारात लुडबुड करतात म्हणून त्यांच्यावर अंमल चालवणे कठीण असते.
- लोक मृत्यूचा धाक मनावर घेत नाहीत कारण जीवनाला कवेत घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो म्हणून ते मृत्यूचा धाक मनावर घेत नाहीत.

## अध्याय - ७६

- माणूस जिवंत असताना कोमल आणि नाजुक असतो. पण मृत्यूनंतर कठीण आणि चिवट होतो (ताठ आणि कडक होतो) सर्व प्राणी आणि झाड जिवंत असताना नाजुक आणि ठिसूळ असतात. पण मेल्यावर ती कोमेजतात, शुष्क होतात.
- म्हणून असे म्हटले जाते की कठीण आणि चिवट हे मृत्यूचे भाग असतात आणि कोमल आणि नाजुक हे जीवनाचे भाग असतात.

- हेच कारण आहे की, सैनिक जेव्हा खुनशी असतात तेव्हा विजय मिळवू शकत नाहीत, झाड जेव्हा खूप चिवट असते तेव्हा मोडून पडते.
- जे सशक्त आणि महान असतात त्यांची जागा खाली असते, (पण) जे कोमल आणि नाजुक असते त्याची जागा वर असते.

## अध्याय - ७७

- बाण ओढायच्या आधी जी अवस्था असते तशीच स्वर्गीय ताओची नसते का ?
- ते धनुष्याचा तो भाग खाली करतात जो (आधी) वर असतो आणि जो भाग वर असतो तो खाली केला जातो. अनावश्यक कमी करणे आणि अपुरा भाग पूर्ण करणे हाच स्वर्गीय ताओ.
- पण माणसांचा ताओ मात्र उलटा असतो. ज्याच्याकडे कमतरता असते त्याच्याकडून काढून घेणे आणि गरज नसत त्याला देणे. गरज नसते

त्याच्याकडून घेऊन कमतरता असते त्याला देणे. गरज नसते त्याच्याकडून काढून घेऊन गरज असते त्याला कोण देऊ शकतो ? त्यालाच शक्य आहे ज्याच्याकडं ताओ आहे. तो लोकांना जितकी जास्त मदत करतो तितका जास्त फायदा त्याला स्वतःला होतो.

- म्हणून संत साठा करत नाही. तो जितके अधिक वाटतो तितके त्याला अधिक मिळत जाते.
- स्वर्गीय ताओ एकाद्याचे भलेच करतो. पण कुणाचे वाईट करत नाही. संतांचा ताओ कर्म करतो पण तृप्त होत नाही.

# अध्याय - ७८

- जगातली सर्वात दुर्बल गोष्ट, जगातल्या सर्वात प्रबल गोष्टीला भारी पडू शकते. पाण्याच्या दुर्बल आणि शरणागत स्वभावाची जगातल्या कोणत्याही गोष्टीशी तुलना होऊ शकत नाही. पण भरीव आणि सशक्त गोष्टीवर तुटून पडण्याची क्षमता पाण्याइतकी कुणाचीच नसते. कारण पाण्याला दुसरा पर्याय नाही.
- अशक्त गोष्ट सशक्त गाष्टीचा पराभव करू शकते आणि शरणागत, प्रबळ गोष्टीला डबघाईला आणू शकते. हे सत्य सगळ्या जगाला कळत

*असते पण कुणी त्याप्रमाणे आचरण करत नाही. म्हणून साधू लोक सांगतात -*

- *जो सर्व जगाचा, सर्व बाजूने तिरस्कार सोसतो तोच जगाचा मालक होऊ शकतो.*
- *जो देशावर आलेल्या सगळ्या संकटांचा भार सहन करतो तो जगाचा राजा बनू शकतो.*
- *ही सत्य वचने आहेत जरी ती विरोधाभासात्मक आहेत.*

## अध्याय - ७९

- पराकोटीच्या मत्सराला प्रेमाने प्रतिसाद द्या. नाहीतर ज्यावेळी मत्सर समेट करायला तयार होईल तेव्हा मत्सर थोडा तरी शिल्लक राहील. याचा शेवट चांगुलपणात कसा करता येईल ?
- म्हणून साधू कराराचा डावा अर्धा भाग धरून ठेवतो (पण) उरलेल्या भागाचे काय करायचे त्याची बळजबरी दुसऱ्या भागधारकावर करत नाही. सद्गुणी (माणसे) कराराचा अवलंब करतात. दुर्गुणी माणसे

*बळजबरीचा आश्रय करतात. स्वर्गीय ताओ पक्षपात करत नाही. तो नेहमी चांगल्या माणसांचा पक्ष घेतो.*

# अध्याय - ८०

- असे समजूया की कमी लोकसंख्येचे एक राज्य आहे. तेथे अनेक साधने असली तरी मी ती उपयोगात आणू देणार नाही. मी लोकांना मान्य करायला भाग पाडीन की मृत्यूही गंभीर बाब आहे. (म्हणून) त्यांनी प ार दूर जाऊ नये. त्यांच्याकडे नावा आणि गाड्या असतील तरी (लोक) त्यातून प्रवास व रणार नाहीत. त्यांच्याकडे चिलखते आणि शस्त्रे असली तरी त्याचे प्रदर्शन करणार नाहीत. मी लोकांमधे लिहिण्यापेक्षा गाठी मारलेल्या दोराचा उपयोग करण्याची प्रथा पुन्हा प्रस्थापित करीन.

- *त्यांना जे जेवण मिळेल त्यात ते सुखी असतील, त्यांच्या पेहेरावात ते आनंदी असतील, राहत्या घरात समाधानी असतील, त्यांच्या चाली किंवा प्रथा आनंदानं पाळतील आणि म्हणूनच शेजारचे राज्य दिसत असले आणि तिथल्या व विळयांची कावकाव आणि कुत्र्याचे भुंकणे ऐकू येत असले तरी (छोट्या राज्यातले) लाक आयुष्यात तिकडे जाणार नाहीत.*

## अध्याय - ८१

- ज्याला कळते तो बोलत नाही. जो बोलतो त्याला कळत नाही.
- जो सत्यवादी असतो तो प्रदर्शन करत नाही. (पण) जो प्रदर्शनकारी असतो तो सत्यवादी नसतो.
- जो सद्गुणी असतो तो वाद घालत नाही. जो वाद घालतो तो सद्गुणी असत नाही.
- जो शिक्षित असतो तो शहाणा असत नाही. जो शहाणा असतो तो शिक्षित नसतो.
- म्हणून साधू स्वतःच्या चांगुलपणाचे प्रदर्शन करत नाही.

**- समाप्त -**

## ।। ताओ उपनिषद् ।।

**संलग्न - १ (वरील उपनिषदात प क्त ताओबद्दल लाओत्से काय म्हणतो त्याचं संकलन)**

१. ताओ जर शब्दात सांगता आला तर तो शाश्वत ताओ नाही. एकाद्या नावाची व्याख्या करता आली तर ते अपरिवर्तनीय नाव नाही. अन् अस्तित्व ही पृथ्वी आणि स्वर्गाच्या आधीची घटना आहे. . (अध्याय १)

२. ताओची पोकळी उपयोगात आणायची (असे) ठरवले तरी (ती पोकळी) भरता येणार नाही. त्याच्या त्या अगाधततेतूनच सर्व वस्तूंचा

आरंभ झाला असावा असे वाटते. त्याच्या खोलीतच (ऊशींह) तो सदैव राहतो. मला माहीत नाही तो कुणाची निर्मिती आहे. पण असे भासते, तो निसर्गाचा पूर्वज असावा. (अध्याय - ४)

३. प्रकृती आणि चैतन्य कधीच मरत नाहीत. दोघे मिळून गूढ मातृत्वाच प्रतीक बनतात. त्यांच्या उगमस्थानातूनच स्वर्ग आणि पृथ्वी प्रकट होतात. ते उगम स्थान अनंत काळ टिकणारे आहे.(कितीही) वापर केला तरी संपत नाही. (अध्याय-६)

४. स्वर्ग आणि पृथ्वीच्या आधी अशी एक गोष्ट अस्तित्वात आली आहे जी अचल आणि अगाध असून निसर्गात अधिष्ठित आहे. ती एकटी असते आणि कधीही बदलत नाही. ती सर्व व्यापी असूनही संपत नाही. तिला विश्व माता असे नाव देता येईल. मला तिचे नाव माहित नाही. पण नाव देण्याची माझ्यावर सक्ती झाली तर मी तिला 'परम सर्वश्रेष्ठ ताओ' म्हणेन. परम म्हणजे पुढे जाणार, पुढे म्हणजे दूर जाणारा, दूर जाणारा म्हणजे मागे ।प रणारा. म्हणून 'ताओ' महान आहे, स्वर्ग महान आहे, पृथ्वी महान आहे आणि माणूसही महान आहे. या विश्वात चार गोष्टी

*श्रेष्ठ आहेत आणि माणूस त्यापैकी आहे. माणूस पृथ्वीचे कायदे पाळतो, पृथ्वी स्वर्गाचे कायदे पाळते, स्वर्ग ताओचे कायदे पाळतो, आणि ताओ त्याच्या मूळ स्वभावाचे कायदे पाळतो. (अध्याय-२५)*

५. *ताओ नेहमीच अनामिक होता. जेव्हा पहिल्यांदा त्याला कामाशी जोडले गेले, तेव्हाच त्याला नाव दिले गेले. (आपण) कितीही नाम निर्देश करत राहिलो तरी आपल्याला क ोठे थांबायचं तेहि कळले पाहिजे. कोठे थांबायचं हे ज्याला कळले, तो अविनाशी होतो. (अध्याय-३२)*

६. परत फिरणे ही ताओची गती आहे. कमकुवतपणा हे ताओचे साधन आहे. विश्वातल्या सगळ्या वस्तूंची निर्मिती अस्तित्वातून होते आणि अस्तित्व अनास्तित्वातून निर्माण होते. (अध्याय-४०)

७. ताओ अदृश्य असून अनामिक आहे. तरी तोच असा एक आहे जो आपला अंश (मानवाला) देऊन (त्याला) पूर्णत्वाला नेतो. (अध्याय ४१ चा शेवटचा भाग)

* * *